**नवोपक्रमाचे शीर्षक**

# “कला सप्ताह देई सुप्त गुणांना वाव”

**:सादरकर्ते:**

**कु.मधुमती रामकिसन सागंळे**

**अधिव्याख्याता**

**जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, यवतमाळ**

**नवोपक्रम गट 5:- अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकिय अधिकारी गट**











**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती. मधुमती रामकिसन सांगळे अधिव्याख्याता या पदावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथे कार्यरत असुन त्यांनी सादर केलेला **"कला सप्ताह देई सुप्त गुणांना वाव"**हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष सन 2023-24 मध्ये त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित या पूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक: 08.12.2023

स्थळ: यवतमाळ

प्राचार्य
डॉ. प्रशांत गावंडे
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
यवतमाळ.

**प्रतिज्ञापत्र**

मी श्रीमती. **मधुमती रामकिसन सांगळे** प्रतिज्ञापत्र लिहुन देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **“कला सप्ताह देई सुप्त गुणांना वाव”**हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमावर, अनुभवावर आधारीत आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहिती च्या आधारे हा नवोपक्रम लिहीलेला नसुन या मध्ये मला जाणविलेल्या समस्याचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम या पूर्वीच्या राज्य स्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही तसेच इतर कोणत्याही व्यक्ती कडून लिहुन घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही तसे आढळून आल्यास तो copyright act 1957 खाली दाखल पात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक: 08.12.2023

स्थळ: यवतमाळ

स्पर्धेकाची स्वाक्षरी

श्रीमती. मधुमती रामकिसन सांगळे

अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यवतमाळ

**नवोपक्रमाचे शीर्षक**

**“कला सप्ताह देई सुप्त गुणांना वाव”**


**:सादरकर्ते:**

**कु.मधुमती रामकिसन सागंळे**

**अधिव्याख्याता**

**जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, यवतमाळ**


**नवोपक्रम गट 5:- अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकिय अधिकारी गट**











**अनुक्रमणिका:**


1. प्रस्तावना
2. नवोपक्रमाची गरज व महत्व
3. नवोपक्रमाची उद्दिष्टे
4. नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा
5. नवोपक्रमाचे नियोजन,कार्यवाही/वेळापत्रक.
6. नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही
7. नयोपक्रमाची यशस्विता, फलनिष्पत्ती
8. संदर्भसूची व परिशिष्टे
9. उपक्रमाचे पुरावे/ क्षणचित्र

## “कला सप्ताह देई सुप्त गुणांना वाव”

### 1.प्रस्तावना:-

मुले शाळेपासून दुर गेले शाळेबद्दलची गोडी कमी झाली. शाळे विषयी, शिक्षणा विषयी मुलांच्या मनात आनास्था निर्माण झाली. अश्या परिस्थितीत शाळेबद्दलची आवड निर्माण करणे गरजेजे वाटत होते, या गरजेतुनच अनेकांनी प्रयत्न केले या पैकी एक प्रयत्न म्हणजे कला सप्ताह होय. लॉकडाऊन नंतर शाळा सुरू झाल्या शाळा सुरू झाल्या पात्र मुलांच्या अनुपस्थितीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे आढळले. मुलांची उपस्थिती कशी वाढवता येईल या दृष्टिने विचार करण्यात आले. तेव्हा लक्षात आले की मुलांना जे आवडते त्यातुन विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लावता येईल. मुलांचे भावविश्व समजून त्यांना आनंद देणारे कृती शाळेतच मिळाल्या तर त्यांना शाळेची गोडी लागेल या उद्देशाने मुलांना आवडणाऱ्या गोष्टींची यादी तयार करण्यात आली सत्राच्या शेवटी पंचायत समिती स्तरावर सभा घेऊन चर्चा करण्यात आली अनेक उपक्रमाचा सहभाग कला सप्ताहामध्ये करण्यात आला. उदा. कला, कार्यानुभव, योगा, डाँस, कौशल्यधिष्टीत शिक्षण या सर्वावर आधारित कृती उन्हाळी शिबीरासाठी घेण्यात आल्या.

या सप्ताहाला दिलेला कालावधी हा 1 मे 2023 ते 8 मे 2023 असा ठरविण्यात आला या कालावधीत पंचायत समिती स्तरावर केंद्र निहाय नियोजन करण्यात आले व त्यानुसार शिक्षकांकडून प्रतिसाद मागविण्यात आले. या प्रतिसादावरून कोणत्या विषयाचा समावेश प्रामुख्याने शिबिरात करावा हे निश्चित झाले. कला, कार्यानुभव, पाक कला, योग, नृत्य, गायन, अशा सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रम पत्रीका तयार करून पंचायत समिती स्तरावरील

अधिकारी यांच्या उपस्थितीत या कला सप्ताहाचे उद्‍घाटन करण्यात आले व नियोजन बध्ध कार्यक्रम वर्ग 1 ली ते 5 वी पर्यंतच्या विद्‍यार्थ्यासाठी घेण्यात आला.

उपक्रमाची गरज व महत्व:-

सन 2023-24 सत्राची सुरूवात होण्याच्या आधी सन 2022-23 मध्ये मुलांच्या शाळेविषयी अनास्था निर्माण होण्याच्या कारणावर चर्चा करण्यात आली. त्यावेळी असे लक्षात आले की ज्योवेळी मुले घरी होती त्यावेळी ते काय करायचे या बाबत पालकांकडून जाणण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मुलांना जास्तीत जास्त खेळण्यात रस वाटतो हे लक्षात आले. घरी खेळायला मिळत असल्यामुळे मुलांना घरी राहणे आवडत होते पण शाळेत हेच वातावरण मिळाले तर मुलांना देखील हे काम करावला आवडेल यावर मुले कोणकोणत्या गोष्टीत घरी रस घेतात हे पालकांकडून प्रस्नावली देऊन जाणून घेतले व एखादा असा उपक्रम राबवावा की ज्यातुन मुलांना या सर्व आवडणाऱ्या बाबी करता येईल. पुढे यातुनच उन्हाळी शिबीर घेण्याचे ठरले व ठरल्या प्रमाणे कला सप्ताहाचे नियोजन करण्यात आले.

**2. वेगळेपण:-**

या उपक्रमाचे वेगळेपण म्हणजे शाळा व कुटुंब या दोन्ही मध्ये जवळचा संबंध जोडल्या गेला. मुलांच्या भावविश्वातील गोष्टींचा समावेश असणारा हा उपक्रम आहे घरी मुले अनौपचारीक वातावरणात असता मात्र शाळेत मिळत नाही. त्यांच्या मनाप्रमाणे आवडणारी गोष्ट मिळत नसल्यामुळे शाळेत येण्याची मुलांची इच्छा होत नाही. मात्र शाळेला सुट्ट्या लागण्याच्या आधी हा उपक्रम घेतल्यमुळे शाळेतुन घरी उन्हाळ्याच्या सुट्ट्यावर जायच्या आधी हा उपक्रम घेतल्याने परत शाळा सुरू होतांना मुलांना पहिल्याच दिवशी शाळेत येण्याची गोडी निर्माण झाली. हे या उपक्रमाचे वेगळेपण आहे.

***उपयुक्तता:-**

**"कला सप्ताह देई सुप्त गुणांना वाव"** हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा असल्यामुळे मुलांच्या सुप्त गुणांना चालना मिळाली. विद्यार्थ्यांची आवड जोपासत असतांनाच कौशल्याधिष्ठीत शिक्षणाला वाव देणारा आहे. इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंतच्या मुलांना नव नविन कला कुसरीच्या गोष्टी शिकविणारा आहे. उदा. मेहंदी काढणे, पापड बनविणे, कागद काम, माती काम या सारख्या गोष्टीचा समावेश या मध्ये करण्यात आलेला असल्यामुळे मुले गुहउद्योगात पालकांना मदत करू शकेल असा हा उपक्रम आहे. व्यवसाय मुलक दृष्टीकोन विकसीत करणारा असा हा उपक्रम आहे ही या उपक्रमाची उपयुक्तता आहे.

## 3. नवोपक्रमाचे उद्दीष्टे:

1. मुलांना शाळेबद्दलची आवड निर्माण करणे.

2. कृतीतील आनंद मुलांना देणे.

3. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे.

4. व्यवसायीक दृष्टीकोन विकसित करणे.

5. कौशल्यधिष्टीत शिक्षण विद्यार्थ्यांना देणे.

6. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे.

## 4.नवोपक्रमाची व्यप्ती व मर्यादा

हा उपक्रम पंचायत समिती हिंगणघाट येथील जिल्हा परिषदेच्या 122 शाळांमधुन इयत्ता 1 ली ते 5 वीतील विद्यार्थ्यांन पुरता मर्यादित आहे.

## 5. नवोपक्रमाचे नियोजन:

***उपक्रम पुर्व स्थितीचे निरीक्षण व चर्चा:-**

लॉकडाऊनक काळात शाळा बंद असल्यामुळे शाळा व विद्यार्थी यांच्या दुरावा निर्माण होत गेला. मुले सतत दोन वर्षे घरी राहिल्या मुळे शाळे विषयी मुलांना अनासथा निर्माण झाली विद्यार्थी शाळेत येण्यास कंटाळा करू लागले व घरी राहणे पसंत करू लागले या मागच्या कारणांचा शोध घेतला असता असे निर्देशनात आले की मुले घरी राहुन खेळणे, चित्र काढणे, कला कार्यानुभव या गोष्टीत रममान होतात यावरून मुलांना जे हवे आहे ते शाळेत मिळत नसल्यामुळे विद्यार्थी व शाळा याच्यातील अंतर वाढत आहे असे दिसून आले.

नंतर याच सर्व गोष्टीचा सामावेक्ष असणारा उपक्रम राबवावा असे ठरले व उन्हाळी शिबीर आनंदाची पर्वणी या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. शाळेला उन्हाळी सुट्ट्या लागण्याच्या आधी एक आठवडा सर्व केंद्रां मधुन जिल्हा परिषद च्या शाळेत या कला सप्ताहाचे नियोजन देऊन विविध कार्यक्रम राबविण्यात आले

***आवश्यक साधनाचा विचार:-**

उन्हाळी शिबीर घेत असतांना उपलब्ध साधनांचा विचार करून शाळेत व मुलांजवळ असणाऱ्या वस्तुंचा उदा. रंग, पेंन्सील, कागद, कैची तसेच घरी उपलब्ध असणाऱ्या साहित्याचा वापर करून कला कार्यानुभव च्या कृती घेण्यात आल्या या करीता पंचायत समिती हिंगणघाट येथील भारत विद्यालय हिंगणघाट येथे कार्यरत कला शिक्षक श्री. सावरकर सर यांची मदत घेण्यात आली तसेच योग मार्गदर्शक श्री विजय धांत्रक यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षण देण्यात आले. पंचायत समिती हिंगणघाट येथील कार्यरत विषय साधन व्यक्ती कविता घोडे यांच्या

मार्गदर्शनाखाली म्युझीकल योग्या या सारख्या विषयाचे त्याच बरोबर पाक कलेचे प्रशिक्षण देण्यात आले. एकंदरित उपलब्ध मार्गदर्शक तथा. उपलब्ध साहित्यांचा वापर करून उन्हाळी शिबीर पार पाडण्यात आले.

## 6.कृतीचा क्रम/ प्रत्यक्ष कार्यवाही

इयत्त 1 ली ते 5 वी पर्यंत सर्व विद्‌यार्थ्यांना उन्हाळी शिबीराच्या माध्यमातून विविध खेळावर आधारित व कौशल्यावर आधारित शिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रम पत्रिका तयार करण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन करून ठरल्या प्रमाणे कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा येथील अधिकारी व शाळेतील घटक पंचायत समिती स्तरावरील अधिकारी या सर्वांच्या साहाय्याने या शिबीरोच उद्‌घाटन करण्यात आले. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा हिंगणघाट येथे या शिबीराचा सुरूवात करण्यात आली व पुढे सर्व शाळांमधुन प्रत्येक केंद्रात हे शिबीर घेण्यात आले. याचे नियोजन खालील प्रमाणे होते.

| **दिनांक** | **विषय व कृती** | **मार्गदर्शक** | **वेळ** |
|---|---|---|---|
| 4 मे 2023 | कला | श्री. सावरकर | सकाळी 8 ते 10 |
| 5 मे 2023 | योगाभ्यास | श्री. विजय धात्रक | सकाळी 8 ते 10 |
| 6 मे 2023 | म्युझीकल योगा | कु. कविता घोडे | सकाळी 8 ते 10 |
| 7 मे 2023 | करियर मार्गदर्शन | श्री. स्वप्निल वाघे | सकाळी 8 ते 10 |
| 8 मे 2023 | समारोप व पाक कला | कु. कविता घोडे<br>श्री. सावरकर | सकाळी 8 ते 10 |

या प्रमाणे नियोजन करून उन्हाळी शिबीर राबविण्यात आली.

***उपक्रम उत्तर स्थितीचे निरीक्षण:-**

नियोजना प्रमाणे जिल्हा परिषद शाळांमधुन पंचायत समिती हिंगणघाट येथे उन्हाळी सुट्टया सुरू होण्याच्या आधी हा उपक्रम राबविण्यात आला. उपक्रम राबविण्याच्या आधी मुलांना आपल्याला सुट्या लागेल व आपण घरी राहु याचा आनंद खुप वाटत होता परतु 8 दिवस शिबीर झाल्यानंतर शेवटच्या दिवशी मात्र मुलांना शाळेत राहण्याची इच्छा होत होती. समारोप झाला तरी मुले पुन्हा काही तरी शिकता येइल म्हणून दुसऱ्या दिवशी शाळेत येण्याची इच्छा दर्शवित होते. उपक्रमात घेण्यात आलेल्या प्रत्येक कृतीत मुले आनंदानी सहभागी झाले होते.

***कार्यवाहीचे टप्पे**

सर्व प्रथम गट साधन केंद्रावर सभा घेण्यात आली सर्व पर्यवेक्षकिय यंत्रणे सोबत चर्चा करून या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. त्या करीता खालील प्रमाणे वेळापत्रक तयार करण्यात आले.

| अ.क्र | महिना पासुन | महिना पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | 4 मे 2023 पासुन | 8 मे 2023 पर्यंत | 8 ते 10 सकाळी |

***नवोपक्रमाची कार्यपध्दती**

**1. पुर्वस्थितीचे निरीक्षण:**

उन्हाळी शिबीर राबविण्याच्या आधी 8 दिवस अगोदर परिक्षा संपल्यानंतर मुले शाळेत येण्यास तयार नव्हते वारंवार पालकांशी संपर्क साधुन देखील मुलांची शाळेतील उपस्थिती कमी होती.

| अ.क्र | शाळांची संख्या | सहभागी विद्‌यार्थ्यांची संख्या | सहभागी शिक्षक |
|---|---|---|---|
| 1 | 122 | 3226 | 367 |

***उपक्रम पुर्ण झाल्यानंतरचे निरीक्षण**

| अ.क्र | शाळांची संख्या | सहभागी विद्‌यार्थ्यांची संख्या | सहभागी शिक्षक |
|---|---|---|---|
| 1 | 122 | 4205 | 367 |

***कार्यवाही करतांना आलेल्या अडचणी**

1. पालकांची शाळेप्रती असणारी अनास्था
2. विद्‌यार्थ्यांची शाळेप्रती असणारी अनास्था
3. एकाग्रता नसणे शिक्षणाची आवड नसणे.

## 7.नवोपक्रमाची यशस्विता, फलनिष्पत्ती

1. विद्‌यार्थ्यांना प्रात्यक्षिक करतांना आनंद मिळाला
2. विद्‌यार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण वाढले.
3. विद्‌यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला.

4. उन्हाळी शिबिराच्या माध्यमातुन शिक्षक व विद्यार्थी यांच्या मैत्री पुर्ण नाते निर्माण झाले.

5. विद्यार्थ्याना उन्हाळी शिबीरातुन शारीरिक सुदृढतेचे धडे मिळाले.

6. विद्यार्थ्यांना व्यवसायीक शिक्षणाचे मार्गदर्शन करण्यात आले.

***समारोप:**

या उपक्रमामुळे मुलांना शाळेविषयी आवड निर्माण झाली शाळेत आल्या नंतर जे बंधिस्त वातावरण वाटत होते. त्यामुळे मुले स्वत: व्यक्त करत नव्हते मात्र उन्हाळी शिबीरातुन प्रत्येक मुलाला कृती करण्याची संधी मिळाली. ही कृती करत असतांना मुले सहकार्याची भावना व्यक्त करू लागले. एक मेकांशी मिळून मिसळून वागू लागले म्हणजेच घरचे वातावरण व शाळेचे वातावरण यात फारसा फरक मुलांना वाटत नव्हता. कला कार्यानुभव, शारीरिक शिक्षण या सारख्या व योगाभ्यास, योगनृत्य, पाक कला, कागद काम, माती काम व कचऱ्यातुन कला निर्माण करण्याची संधी मुलांना मिळाल्या मुळे मुले खुप आनंदी झाले. शिबीराच्या पहिल्या दिवसापासुन ते शेवटच्या दिवसा पर्यंत मुलांचा उत्साह कायम होता. उन्हाळ्याच्या सुट्यात पापड बनवण्या सारख्या कला हस्तगत झाल्यामुळे त्याची मदत पालकांना देखील झाली अश्या प्रकारे विद्यार्थ्याच्या व्यक्ती मत्वाला आकार देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

## 8. संदर्भ सुची व परिशिष्टे

1. कला कार्यनुभवची पुस्तके

2.व्हिडीओ व कंप्युटर वरील विविध ॲप.

3. जिवन शिक्षण मासिक

## 9. उपक्रमाचे पुरावे / जोडावयाचे पुरावे:










You can dream it
you can do it.


"Nothing is impossible
The word itself says
"I'm possible"!"
ग्रीष्मकालीन शिबिर
समारोप
दिनांक - 04-05-2022